| MHAU110001642026 | **दिवाणी किरकोळ अर्ज नं.२५/२०२६ मधील नि.०१ खालील अंतिम आदेश (संतोष रसाळ व इतर वि. कोणीही नाही.)** |
|---|---|

अर्जदारांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट VIII, सन १८२७ च्या कलम २ प्रमाणे वारसा दाखला मिळणेसाठी हा अर्ज दाखल केला आहे.

**२.** प्रस्तुत अर्जातील अर्जदार क्र.१ ची पत्नी, अर्जदार क्र.२ ते ७ हे मुले व मुली व अर्जदार क्र. ७.१ ची सासु, अर्जदार क्र.७.२ ते ७.४ चे आजी मयत सुमनबाई संतोष रसाळ (यापुढे त्यांस 'मयत व्यक्ती' म्हणुन संबोधले आहे) हे दि.१९/०७/२०१८ रोजी मौजे लेहा जहागीर, ता.फुलंब्री येथे वयोवृध्दपणामुळे मयत झालेले आहे. तसेच अर्जदार क्र.१ चा मुलगा, अर्जदार क्र.२ ते ६ चा भाऊ, तसेच अर्जदार क्र.७ मयत असुन त्यांचे वारस अर्जदार क्र.७.१ चे पती, अर्जदार क्र.७.२ ते ७.४ चे वडील मयत ज्ञानेश्वर संतोष रसाळ हे दि.२१/०७/२०२३ रोजी मौजे लेहा जहॉगीर, ता.फुलंब्री येथे आजारपणामुळे मयत झालेले आहे. त्यामुळे अर्जदार हेच मयत सुमनबाई संतोष रसाळ यांचे कायदेशीर वारस आहेत.

**४.** मयत सुमनबाई संतोष रसाळ यांचे अर्जदार क्र.१ ते ६, अर्जदार क्र.७ मयत त्यांचे वारस अर्जदार क्र.७.१ ते ७.४ हे कायदेशीर वारस असल्याबात अर्जदार यांना शासकीय / निमशासकीय कामासाठी वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे अर्जदार यांनी सदरचा अर्ज मा.न्यायालयात दाखल करण्यास कारण घडले आहे.

**५.** तसेच मयत सुमनबाई संतोष रसाळ यांनी त्यांच्या हयातीत कोणत्याही प्रकारचे मृत्यूपत्र अगर कोणत्याही प्रकारचे नॉमीनेशन लेख करून ठेवलेले नव्हते व नाहीत.

**६.** प्रस्तूत अर्जाचे निर्गतीकरीता खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित झाल्यामुळे त्यांच्या कारणामीमांसेसह त्याचे उत्तर खालीलप्रमाणे नमुद करत आहे.

| **अनु. क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अर्जदार यांनी मागणी केल्याप्रमाणे वारस दाखला मिळणेस पात्र आहेत का ? | होय |
| २. | काय आदेश ? | अर्ज मंजूर करण्यात आला. |

## <u>कारणमीमांसा</u>

**७.** अर्जदार यांनी आपल्या अर्जातील कथनांना पुष्टी देण्यासाठी मयत सुमनबाई संतोष रसाळ यांचा मृत्युचा दाखला, मयत ज्ञानेश्वर संतोष रसाळ यांचा मृत्युचा दाखला, वारस प्रमाणपत्र, अर्जदार क्र.१ ते ६ व अर्जदार क्र.७.१ ते ७.४, मयत रजिया शेख यांचे आधार कार्ड असे दाखल केले आहेत. शेवटी अर्जदार यांनी आपला तोंडी पुरावा संपला असल्याचे सांगून त्याबाबत तशी पुरसीस दिली.

## <u>मुद्दा क्रमांक १ बाबत</u> –

८. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता जाहीर नोटीसची बजावणी करण्याचा हुकूम पारित करणेत आला. अर्जदाराच्या मागणीप्रमाणे दि.३१/०१/२०२६ रोजी "दैनिक आनंदनगरी" छत्रपती संभाजीनगर आवृत्ती मधील जाहिरनामा व जाहीर नोटीस काढण्यात आली. जाहिर नोटीसीच्या प्रसिध्दीनंतर देखील अर्जदार हे सुमनबाई संतोष रसाळ यांचे वारस नाहीत अशी तक्रार अथवा हरकत कुणीही विहीत कालावधीमध्ये आजतागायत उपस्थित केलेली नाही.

**९.** अर्जदार क्र.१, २, ६ व ७.१ यांनी याकामी आपले सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. सरतपासाचे प्रतिज्ञापत्रातील मजकूर हा अर्जातील कथने व दाखल कागदपत्रे यांचेशी पूर्णपणे सुसंगत आहेत. थोडक्यात, अर्जदार यांच्या या अर्जातील कथनांना कोणीही आव्हानीत केलेले नाही. तसेच अर्जदार क्र.१ ची पत्नी, अर्जदार क्र.२ ते ७ हे मुले व मुली व अर्जदार क्र. ७.१ ची सासु, अर्जदार क्र.७.२ ते ७.४ ची आजी असल्याची व अर्जदार आणि सुमनबाई संतोष रसाळ हे हिंदू असल्याची बाब वादातीत नाही. हिंदू वारसा कायदा १९५६ च्या परिशिष्टाप्रमाणे अर्जदार क्र.१ पत्नी, अर्जदर क्र.२ ते ७ वडील, अर्जदार क्र.७.१ सुन व अर्जदार क्र.७.२ ते ७.४ मयत सुमनबाई संतोष रसाळ यांची नातु व नात असल्याने अर्जदार हे त्यांचे वर्ग–१ वारस ठरतात.

**१०.** बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट नियम ३, नुसार घोषणापत्रक/जाहीरनाम्यात उल्लेख केलेली मुदत संपेल त्यावेळी, पुरेशी होईल अशी कोणतीही हरकत घेण्यात आली नसेल तर, न्यायालयाने दावा सांगणाऱ्या इसमाच्या हक्कासंबंधी देण्यात येईल तो पुरावा ताबडतोब स्वीकारला पाहिजे आणि त्याची खात्री झाली तर, तो इसम मृत इसमाचा मान्यता दिलेला औपचारीक वारस असल्याचे जाहिर करणारे प्रमाणपत्र त्यास दिले पाहिजे.

**११.** अर्जदार हे मयत सुमनबाई संतोष रसाळ यांचे कायदेशीर वारस असल्याची बाब सकृतदर्शनी स्पष्ट होते. त्यामुळे अर्जदार हे मयत सुमनबाई संतोष रसाळ यांचे औपचारीक वारस आहेत हे जाहिर करणे व अर्जदार यांना वारसा दाखला प्रमाणपत्र देणे हे न्यायोचित ठरते. म्हणून मी मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी नोंदवत आहे.

## मुद्दा क्र. २ करीता

**१२.** मुद्दा क्र. १ चे उत्तर पाहता अर्जदार हे मयत सुमनबाई संतोष रसाळ यांचे वारस असल्याचे सिध्द होते. मयत इसम हा या न्यायलयाच्या अधिकार क्षेत्रामधील मुळचा रहिवासी होता. वरील सर्व गोष्टींचे अवलोकन केले असता, अर्जदारांचा अर्ज मंजूर करण्यास पात्र आहे, म्हणून मुद्दा क्र. २ चे उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

| **आदेश** | |
|---|---|
| १. | अर्जदारांचा अर्ज मंजूर करण्यात येतो. |
| २. | याद्वारे असे घोषित करणेत येते की, अर्जदार क्रमांक १ ते ६, अर्जदार क्र.७ मयत असुन त्यांचे वारस अर्जदार क्र.७.१ ते ७.४ हे मयत सुमनबाई संतोष रसाळ यांचे वारस आहेत. |
| ३. | अर्जदार यांनी योग्य ती न्यायालयीन शुल्क भरल्यास उपरोक्तप्रमाणे वारसाहक्क प्रमाणपत्र (heir-ship certificate) प्रदान करण्यात यावे. |

CHANDRAKANT RAMCHANDRA PATIL
Digitally signed by CHANDRAKANT RAMCHANDRA PATIL
Date: 2026.03.12 15:49:40 +0530

**फुलंब्री**
**दिनांक : १२/०३/२०२६**

**(चंद्रकांत रामचंद्र पाटील)**
**सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,**
**फुलंब्री.**

**प्रमाणपत्र**

मी हमी देते की, सदरच्या पी.डी.एफ. फाईलमधील मजकूर हा मुळ ऑर्डरमधील प्रत्येक शब्दानुसार बरोबर आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखक | ***के. एम. शिंदे*** |
| न्यायालय | सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, फुलंब्री |
| न्यायनिर्णय घोषीत दिनांक | १२/०३/२०२६ |
| न्यायीक अधिकारी यांनी सही केलेले दिनांक | १२/०३/२०२६ |
| न्यायनिर्णय अपलोड केलेले दिनांक | १२/०३/२०२६ |